# फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१२६/२०२६ मधील नि.क्र.१ वरील आदेश

## (पारित दिनांक ०८ जुलै, २०२६)

अर्जदार अंजु गुरुबचन नानावत, वय – २६ वर्ष, धंदा – मजुरी, रा. धनाजी शेळकेवस्ती, वाखारी ता. दौंड, जि. पुणे यांनी त्यांचे मालकीचे जप्त सॅमसंग कंपनीचा मोबाईल ज्याचा IMEI No.३५४०६८५३०८४७५५६ त्याच्या ताब्यात मिळणेकामी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ प्रमाणे सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराचे कथनानुसार सदरचा मोबाईल राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक–२, पुणे यांनी महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ए) ई, गु.क्र.२१७/२०२६ जप्त केला आहे. गुन्ह्यातील जप्त मोबाईल त्याचे मालकीचा असुन वैयक्तीक वापराकरीता सदरचा मोबाईल विकत घेतला आहे. सदर गुन्ह्याचा गुणदोषावर निकाल लागण्यास बराच कालावधी लागणार आहे. तसेच सदर मोबाईल जप्त केल्यापासुन जाबदेणारच्या ताब्यात आहे. सदर मोबाईल परत न मिळाल्यास मोबाईलमधील डाटापासुन वंचित राहावे लागणार आहे. सदर मोबाईल परत दिल्यास त्याच्या मुळ स्वरुपात बदल करणार नाही. तसेच न्यायालयाच्या अटी व शर्तीचे पालन करण्यास तयार असल्यामुळे सदरचा मोबाईल परत मिळण्याची विनंती केली.

०२. सदर अर्जावर राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र.–२, पुणे यांचे म्हणणे मागविण्यात आले असता त्यांचे म्हणणेनुसार सदर अर्जदार/आरोपीविरुध्द् गुन्हा नोंद असुन सदर गुन्ह्यात मोबाईल जप्त करण्यात आले आहे. सदर मोबाईलचा ताबा अर्जदाराला दिल्यास पुन्हा मोबाईल पुराव्याकामी हजर करण्याची शाश्वती नाही. तसेच सदरचा मोबाईलचा वापर करुन शासनाचा महसुल बुडवुन अवैध मद्य वाहतुक व विक्री करण्याची शक्यता आहे. तसेच सदर मोबाईल शासनजमा करण्यास पात्र असल्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्याची मागणी केली.

०३. सदर अर्जावर सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे मागविण्यात आले असता त्यांचे म्हणणेनुसार सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा असुन आरोपीकडे अवैध दारुसाठा मिळुन आला आहे. जप्त मोबाईलचा उपयोग गुन्हा करण्यासाठी झाला असुन सदर मोबाईल परत दिल्यास तो अशाचा प्रकरच्या गुन्ह्यात वापरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०४. अर्ज, म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांतर्फे युक्तिवाद ऐकण्यात आला. अर्जदाराने सदर मोबाईल परत मिळणेकरीता मोबाईल खरेदी केल्याची पावती (नि.१०), प्रथम खबर अहवाल आणि अर्जदाराच्या आधार कार्डची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर जप्त मोबाईलचा मुळ मालक अर्जदार ही आहे. प्रथम खबरी अहवालाचे अवलोकन केले असता सदर अर्जदार ही त्यात आरोपी असल्याचे दिसुन येत नाही. जप्त मोबाईल प्रस्तुत प्रकरणात पुराव्याचा भाग होवु शकत नाही. याउपर सदर जप्त मोबाईल बंद अवस्थेत पडुन राहील्यास विपरीत परिणाम होवुन त्याची उपयुक्तता कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच मोबाईलमध्ये बॅटरीसारखी उपकरणे असल्याने त्याचे वापराविना खराब होण्याची शक्यता आहे. सदर मोबाईल यापुर्वीदेखील अशाच गुन्हयात वापरण्यात आले, असे तपासी अंमलदाराचे म्हणणे नाही. त्यामुळे केवळ अर्जदार सदर मोबाईल अशाच प्रकारच्या गुन्हयात वापर करेल, या कारणास्तव अर्ज नामंजूर करणे संयुक्तीक नाही. त्या अनुषंगाने अर्जदारावर अटी व शर्ती लादणे संयुक्तीक आहे.

०५. एकंदरीत गुन्हयाचे स्वरुप विचारात घेता सदर जप्त मोबाईल हा पुराव्याचा भाग होवु शकत नाही. याउपर अर्जदाराव्यतिरीक्त इतर कुणीही मोबाईलचा ताबा मिळण्याबाबत अर्ज दाखल केला नाही. सदर मोबाईल बंद अवस्थेत असल्याने खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

०६. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ व मा. सर्वोच्च न्यायालयाचे **सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गुजरात सरकार** या प्रकरणातील न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता न्यायालयाने पोलिसांनी जप्त केलेला मुद्देमाल हा विनाविलंब योग्य त्या ताबेदाराकडे सुपूर्द करणे बंधनकारक आहे. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर मोबाईल हे अशाच प्रकारच्या गुन्हयामध्ये वापरण्याची शक्यता असल्याची भिती व्यक्त केली. जप्त मुद्देमालाचा अंतरिम ताबा अर्जदारास अटी व शर्तीवर देणे उचित होईल. उपरोक्त चर्चेवरुन मी खालील आदेश पारीत करीत आहे –

## **: आदेश :**

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्रमांक–२, पुणे यांचे संबंधित अधिकारी यांनी अपराध क्र.२१७/२०२६ मधील सॅमसंग कंपनीचा एस–२४ मोबाईल ज्याचा IMEI No.

३५४०६८५३०८४७५५६ याचा अंतरीम ताबा अर्जदार अंजु गुरुबचन नानावत यांच्याकडुन रक्कम रुपये ५०,०००/– (अक्षरी पन्नास हजार रुपये चे बंधपत्र) (Idemnity Bond) घेवुन सदर अर्जदारास देण्यात यावे.

३. राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्रमांक–२ यांचे संबंधित अधिका–यांनी त्यांच्यासमक्ष जप्त सॅमसंग कंपनीचा मोबाईल ज्याचा IMEI No.३५४०६८५३०८४७५५६ चे फोटो काढुन दोषारोपपत्रात दाखल करावे.

४. सदर जप्त सॅमसंग कंपनीचा मोबाईल ज्याचा IMEI No. ३५४०६८५३०८४७५५६ याचा ताबा देण्यापुर्वी राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र.–२, पुणे यांचे संबंधित अधिका–यांनी त्या अनुशंगाने सखोल पंचनामा करावा.

५. अर्जदाराने सॅमसंग कंपनीचा मोबाईल ज्याचा IMEI No.३५४०६८५३०८४७५५६ तपासकामी लागल्यास तपासी अधिका–यासमक्ष अथवा न्यायालयासमक्ष सादर करावे.

६. अर्जदाराने संबंधित गुन्हयाचे प्रकरणाच्या अंतिम निकालापावेतो सदर जप्त मोबाईलमध्ये कोणताही बदल करु नये अगर त्याची कोणत्याही रितीने विल्हेवाट लावु नये अगर विकु नये अथवा अशा प्रकारच्या गुन्ह्यामध्ये वाहनाचा वापर करु नये.

७. तपासी अंमलदारास आदेशित करण्यात येते की, प्रकरणात सुप्रूतनामा वगैरे दोषारोपपत्रात दाखल करावे.

८. येणेप्रमाणे संबंधित विभागाला पत्र पाठवावे.

SHAILENDRA NANDKISHOR PATIL

Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2026.07.08 17:13:41 +0530

दौंड,
दिनांक ०८/०७/२०२६

(शैलेंद्र नं. पाटील)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, दौंड, जि. पुणे